# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

मुख्य कचेरी : ४ ब, बी.जे. रोड, पुणे - ४११००१.

PDCC BANK ✻ पो. बॉक्स नं.१०९ ✻ दुरध्वनी क्र.: २६१३३८३३, २६१३९३००. ई-मेल: ho@pdccbank.com

## ✻ उमेदवारांकरीता महत्वाच्या सुचना ✻

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे यांनी दि. ०७.०८.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने दि. २२.०८.२०२५ ते दि. २५.०८.२०२५ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती. सदर ऑनलाईन परीक्षेची सुधारित उत्तरतालिका उमेदवारांच्या लॉगिनमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सबब यापुढे कोणतेही लेखी/ई–मेल अथवा अन्य मार्गाने प्राप्त आक्षेप हरकती विचारार्थ घेण्यात येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सद्यस्थितीस स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम मा. राज्य निवडणूक आयोगाने जाहिर केलेला आहे. त्यानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रामध्ये आचार संहिता लागू झालेली आहे. सदर आचार संहिता कालावधीमध्ये मुलाखत कार्यक्रम जाहिर करून मुलाखती घेता येणार नाहीत. सबब तुर्तास सदर भरती प्रक्रिया ज्या टप्प्यावर आहे त्या टप्प्यावर स्थगित ठेवण्यात येत आहे. सदर भरती प्रक्रियेबाबतची अद्ययावत माहिती बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी संकेतस्थळावरील माहितीचे वेळोवेळी अवलोकन करून पालन करावे.

(स्वाक्षरी)
मुख्य कार्यकारी अधिकारी